BRL - 2021-22

(4)

III A. Research Papers publication: Paper-058



आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

September 2021, Issue-80, Vol-03

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com. vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Smt. Sindhutai Jadhav Maha... Mehkar 330



40) खरगोन जिले के आदिवासी क्षेत्रों में स्वास्थ्य एवं शिक्षा.....
डॉ सुरेश अवासे, खरगोन म.प्र. ||167

41) उत्तराधुनिक संस्कृति और मुन्नी मोबाइल
Dr- Ganesh M, Thiruvananthapuram- ||172

42) प्राकृतिक आपदा, प्रबन्धन : एक मूल्यांकन
ओमप्रकाश मीना, दौसा, राज. ||174

43) रामायण एवं रामचरित्रमानस में वाल्मीकि एवं तुलसीदास का.....
मनु कुशवाह, डॉ. कृष्णा जैन, ग्वालियर (म.प्र.) ||179

44) "धम्मपद में दार्शनिक तत्त्व एक अध्ययन"
विजय प्रकाश सिंह, दतिया (म.प्र.) ||182

45) समस्या नाटककार उपेंद्रनाथ अश्क के नाटकों का समीक्षात्मक अध्ययन
डॉ. गुरुकुमार आनन्द, बेगुसराय ||185

46) जैवविविधतेचे मूल्य आणि ऱ्हास याबाबतीत युवकांत असलेली......
प्राचार्य डॉ. बालाजी रंगनाथराव लाहोरकर, बुलडाणा ||188

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

मोठमोठे घरबांधणी प्रकल्प, व्यापारी संकुले बांधून, त्याद्वारा मोठा आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज सर्वत्र अल्पावधीतील फायद्याचा विचार केला जात असल्याने भविष्यकाळात याचे काही दुष्परिणाम सोसावे लागणार आहेत, याचा विचारच केला जात नाही. पाण्यातील भरावामुळे तेथील जैवविविधता नष्ट होत आहे याचा विचारच केला जात नाही.

तसेच आज अस्तित्वात असलेले कायदे जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी पुरेसे नाहीत. कारण कायदव्यवस्थेचे विकेंद्रीकरण न होता, विशिष्ट लोकांच्या, शासनाच्या हातात कायदे केंद्रित झालेले असल्याने व सामान्य लोकांचा, स्थानिक किंवा जैवविविधतेबाबत जाणकार असणाऱ्यांचा नियोजनात, कायद्याच्या निर्मितीत सहभाग नसल्याने, म्हणजे कायदे करणारे व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी व वापर करणारे यांचा अर्थाअर्थी काही संबंध नसल्याने पारंपरिक, अनौपचारिक कायदे बदलून त्याऐवजी औपचारिक कायदे लादले गेले आहेत. उदा. वनसंरक्षण कायद्यात बदल करून, पूर्वी स्थानिक लोकांना असणारे अनेक अधिकार या कायद्याद्वारे नियंत्रित केले गेले किंवा नष्ट केले. ज्या वनसंपत्तीवर स्थानिक लोकांच्या अनेक पिढ्या उदरनिर्वाह करीत होत्या, त्यावरच या कायद्याने बंदी घातली.भारताचा विचार करता भारतातील बराचसा जंगलांचा भाग, की जो जैवविविधतेसाठी प्रसिद्ध आहे, असा बहुतांश भाग राज्य व केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली आहे. त्यामुळे वनसंरक्षण, राष्ट्रीय उद्यान संरक्षण, प्राणी व वस्तुसंग्रहालयांचे जतन व संरक्षण यांद्वारा शासन यंत्रणा जंगल — जमीन व इतर नैसर्गिक संपत्तीची मालकी स्वत:च्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याने शासनाबरोबरच, नोकरशहांचा नको इतका हस्तक्षेप वाढला आहे.

**जैवविविधतेचे मूल्य आणि ऱ्हास याबाबतीत युवकांत असलेली जागरूकता :**

प्रस्तुत अभ्यासात संशोधकाने जैवविविधतेचे मूल्य आणि ऱ्हास याबाबतीत युवकांत असलेली जागरूकता तपासण्याचा प्रयत्न केला आहे. युवक जागृत असतील तरच येणाऱ्या काळात जैवविविधतेचे रक्षण करणे शक्य होईल. यासाठी श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांना यादृच्छिक निवड पद्धतीने सर्वेक्षणात समाविष्ट करून त्यांच्याकडून प्रश्नावलीद्वारे प्रतिसाद गोळा केले गेले. प्राप्त प्रतिसादांच्या विश्लेषण व अर्थनिर्वचनाद्वारे पुढील निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

१. आज जागतिकीकरणाच्या नावाखाली सर्वत्र मुक्त व्यापार सुरू आहे त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या भारतासारख्या विकसनशील देशात व्यापारासाठी प्रवेश करीत आहेत या विधानाशी ९०टक्के प्रतिसादक सहमत आहेत.

२. माशांच्या पुर्नपैदासीच्या काळातजुलै– ऑगस्ट महिन्यात स्थानिक लोक मासेमारी करीत नाहीत त्या काळातही या बहुराष्ट्रीय कंपन्याच्या बोटी मासेमारी करीत असतात या विधानाशी ७५ टक्के प्रतिसादक सहमत आहेत.

३. बहुराष्ट्रीय कंपन्या कशाचेही भान ठेवत नाहीत, केवळ व्यापार, नफा एवढाच विचार करतात त्याचा परिणाम जैवविविधतेवर होत आहे या विधानाशी सर्वच प्रतिसादक सहमत आहेत.

४. अनेक प्राणी, पक्षी व वनस्पती वैद्यकीय व औषधी उपयोगासाठी वापरले असल्याने त्यांचेही अस्तित्व धोक्यात आले आहे. या विधानाशी ९० टक्के प्रतिसादक सहमत आहेत.

५. मोठ्या उद्योगांमधील दूषित पाणी, रसायने, टाकाऊ द्रव्ये व पदार्थ नद्या, नाले व समुद्रात सोडले जात असल्याने त्याचा पाण्यातील विविध जैवकांवर अयोग्य परिणाम होत आहे. या विधानाशी ८०टक्के प्रतिसादक सहमत आहेत.

६. अन्नसाखळीतील सर्व सजीव अन्न आणि पर्यायाने ऊर्जा मिळविण्यासाठी परस्परांवर अवलंबून असतात या विधानाशी९०टक्के प्रतिसादक सहमत आहेत.

७. परीसंस्थेतील प्रत्येक जिवंत अथवा मृत घटक दुसऱ्या सजीवांचे अन्न असतेया विधानाशी सर्वच प्रतिसादक सहमत आहेत.

८. परिसंस्थेकडून, आणि पर्यायाने जैवविविधतेकडूनपरिसंस्था– सेवाद्वारे विविध प्रकारचे फायदे अनेक स्वरुपात मानवाला मिळत असतात या विधानाशी सर्वच प्रतिसादक सहमत आहेत.





९. शासन यंत्रणा जंगल — जमीन व इतर नैसर्गिक संपत्तीची मालकी स्वत:च्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याने शासनाबरोबरच, नोकरशहांचा नको इतका हस्तक्षेप वाढला आहेया विधानाशी ९० टक्के प्रतिसादक सहमत आहेत.

१०. भारतातील शहरी भागात तलाव, नद्या, खाड्या यांच्यात मोठ्या प्रमाणात भराव घालून मोठमोठे घरबांधणी प्रकल्प, व्यापारी संकुले बांधून, त्याद्वारा मोठा आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला जात आहेया विधानाशी ८० टक्के प्रतिसादक सहमत आहेत.

**समारोप:**

जैवविविधतेचे मूल्य आणि ऱ्हास याबाबतीत महाविद्यालयीन युवक जागरूक तर आहेतच परंतु त्यांच्या या जागरूकतेचा पर्यावरणीय मूल्यसंवर्धनाच्या दृष्टीने नियोजनपूर्वक कृती घडणे आवश्यक आहे. कारण जैवविविधता टिकणे ही भारतासारख्या देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गरज आहेय भारतातील बहुतांश लोकांचे दैनंदिन जीवन या नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबुन आहे त्यामुळे, तिचे अस्तित्व टिकणे ही भारतात काळाची गरज आहे. जैव विविधतेच्या विविध मूल्यांची जोपासना केल्याने वनसंरक्षणच तर होत असेच पण जैवविविधताही टिकून राहण्यास हि मूल्ये महत्वपूर्ण भूमिका बजावतात. तसेच जैवविविधतेसाठी घटक ठरणाऱ्या मानवाच्या सवयींचे योग्य नियमन झाल्यास नष्ट होत जाणारी जैवविविधता संरक्षित करता येईल. प्रस्तुत अभ्यासात करण्यात आलेल्या सर्वेक्षणावरून या जैवविविधतेचे संरक्षक तयार होत आहेत हे निश्चित. कारण हे युवकच उद्याच्या पर्यावरणाचे मालक, रक्षक आणि उपभोक्ता आहेत, त्यांच्यात असणारी जैवविविधतेच्या मूल्य आणि ऱ्हासाबाबतीतली जागरूकताच याकामी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

संदर्भ:

- https%//vishwakosh-marathi-gov-in/
- https%//marathivishwakosh-org/
- https%//maharashtratimes-com/
- http%//www-nhrc-nic-in/
- http%//www-mshrc-gov-in/
- http%//www-economist-com/
- http%//shikshanvivek-com/
- http%//mr-vikaspedia-in/
- http%//mpcb-gov-in/hazardous/
- http%//mnsblueprint-org/
- http%//legislative-gov-in/

□□□

Coordinator IQAC
Smt. Sindhutai Jadhao College
Mehkar, Dist. Buldana